17-03-2025-Dai-02new_DH_PAN_28_04_2016-2.qxp 16-03-2025 22:52 Page 1



# 'आरोग्यसेवा घरोघरी पोहवण्याचा प्रयत्न'

## ६० नवे मेडिकल ऑफिसर, ७५ रुग्णवाहिका उपलब्ध करणार : डिचोलीत मेगा आरोग्य शिबिर

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १६ :** राज्यातील प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी सुरक्षा कवच निर्माण करून आरोग्यसेवा घरोघरी पोहोचणे आमचा प्रयत्न असून त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रत्येकाचे जीवन आरोग्य संपन्न ठेवण्यासाठी सरकार कार्यरत आहे ६० नवे मेडिकल ऑफिसर ७५ नवीन रुग्णवाहिका डिचोली तालुका दत्तक घेणे तसेच डिचोलीत ऑपरेशन थिएटर व आधुनिक सुविधा पुरवणे यावर आमचा भर असल्याचे प्रतिपादन आरोग्यमंत्री विश्वजीत राणे यांनी डिचोली येथे केले.



डिचोली : मेगा आरोग्य शिबिराचे तपासणीसाठी जमलेले नागरिक.

गोवा वैद्यकीयमाहिद्यालय आरोग्य खाते डेंटल हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने डिचोलीतील सामाजिक आरोग्य केंद्रात भव्य आरोग्य शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, डीन डॉ. शिवानंद बांदेकर, डॉ. रूपा नाईक, डॉक्टर आयता व इतर मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

नरेंद्र मोदी यांनी आरोग्य सेवा घरोघरी पोहोचवण्याचा संकल्प केला असून त्यासाठी या छोट्याशा राज्यात आम्ही आधुनिक सुविधांच्या मार्फत तसा प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले. आमचे सरकार हे हृदय असलेले व माणुसकी जपणारे सरकार असल्याने आरोग्यसेवा प्रत्येकाच्या दारातनेत सर्व धर्मीयांना उत्तम सेवा देणे हे आमचे कर्तव्य आहे.

राज्यातील अंगणवाडी सेविका व इतर महिलांच्या माध्यमातून गावागावातील आरोग्याची काळजी समजत असते.

रिलायन्स कंपनीच्या मार्फत राज्यात विविध ठिकाणी एक कमांड सेंटर सुरू करून प्रत्येकाच्या आरोग्याबद्दल तपशील गोळा करून उपचार करणे सोपे होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

डिचोली व मडकई येथील ऑपरेशन थिएटर लवकरच कार्यान्वित करण्यात येणार आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मार्फत २१२ उपआरोग्य केंद्रात १५ विविध टेस्टिंग सुविधा करणारी मशिनरी उपलब्ध करण्याचे त्यांनी सांगितले.

प्रजेची सेवा करण्याची विचारधारा पंतप्रधान मोदीजींनी व्यक्त केली असून त्यासाठी या छोट्याशा राज्यात आधुनिक सुविधा नियुक्त आरोग्य सेवा देताना सामान्य माणसालाही प्रसंगी विमानाने इतर राज्यात व राज्यात उपचारासाठी नेण्याची करण्याची सुविधाही उपलब्ध करण्यासाठी आमचे प्रयत्न असतील, असे राणे यांनी सांगितले.

डिचोली आरोग्य केंद्राना आधुनिक सुविधांचा साज पुरवताना सर्व प्रकारच्या सुविधा उपलब्ध करण्यात येतील तसेच मुलांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी ही विशेष योजना राबवू असे त्यांनी सांगितले. आजार हा सांगून येत नाही मी सर्व प्रकारच्या गोष्टी करत असलो तरी माझ्या घरातच कॅन्सर रुग्ण आहे त्यामुळे महिलांनी आरोग्याची नियमित तपासणी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

आरोग्य बाबत आपण सतर्क होणे गरजेचे आहे.डिचोली तालुका आपण आरोग्यसेवा विशेषत्वाने योग्य पद्धतीने पुरवता यावी यासाठी हा तालुका दत्तक घेत असल्याची घोषणा विश्वजीत राणे यांनी केली.

आमदार डॉ. चंद्रकांत शेटये यांनी डिचोली सामाजिक आरोग्य केंद्रात आधुनिक सुविधा बहाल करण्याची गरज असून त्या ठिकाणी डॉक्टरांची संख्या वाढवणे उपलब्ध असलेल्या ऑपरेशन थेटर कार्यान्वित करणे व इतर सुविधा बहाल करताना या भागात लोकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी आवश्यक सुविधा निर्माण करण्याचे आवाहन केले

राणे व मान्यवरांच्या हस्ते आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. आरोग्य शिबिराला खूप मोठा प्रतिसाद लाभला. वेगवेगळ्या पद्धतीचे स्क्रीनिंग तपासणी तसेच महिलांचे कॅन्सर व इतर आजारांवर तपासणी करून औषधोपचार करण्यात आला आरोग्य तपासणी झालेल्या रुग्णांची नियमित तपासणी करण्यासाठी ही गोवा वैद्यकीय महाविद्यालय पाठपुरावा करणार असल्याचे सांगण्यात आले. सिद्धी कासार यांनी आभार मानले सिद्धी उपाध्ये यांनी सूत्रसंचालन केले.



# भंडारी समाजातर्फे पर्वरीत वधूवर मेळावा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १६ :** गोमंतक भंडारी समाजाच्या केंद्रीय समितीतर्फे रविवारी पर्वरी येथील संत गाडगे महाराज सभागृहात भंडारी समाजातील वधूवरांचा मेळावा आयोजित केला होता व त्याला उस्फूर्त प्रतिसाद लाभला. जलस्त्रोत मंत्री तथा भंडारी समाजाचे नेते सुभाष शिरोडकर यांच्या हस्ते दिप प्रज्वलित करून व भंडारी ज्ञातीचे दैवत श्री रुद्रेश्वराच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पून मेळाव्याचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष दामोदर नाईक,केंद्रिय समितीचे अध्यक्ष देवानंद अर्जुन नाईक, उपाध्यक्ष कृष्णकांत शाणू गोवेकर, सल्लागार मंडळाचे अध्यक्ष तथा मेळाव्याचे समन्वयक अशोक कृष्णा नाईक, खजिनदार मंगलदास नाईक, सचिव रुपेश नाईक व संजय पर्वतकर, सहखजिनदार अवधूत नाईक, कार्यकारी सदस्य प्रकाश मंगेश कलंगुटकर, विजय महादेव कानोळकर, दिलीप नाईक, वासुदेव विर्डीकर तसेच तालुका समिती, महिला मंडळ पदाधिकारी उपस्थित होते. भंडारी समाजा संस्थेची स्थापना त्यावेळचे समाज नेते बाबलो नाईक यांच्या अध्यक्षतेखाली झाली व त्यांनी समाजकार्याला सुरुवात केली असे सांगून, देवानंद नाईक म्हणाले भंडारी समाज संस्थेला आतापर्यंत १३ अध्यक्ष लाभले व त्यांनी समाजाच्या विकासाठी योगदान दिले आहे. सामाजिय तरूण हुतात्मा बाळा राया रामा यांच्या हौतात्म्याचा ही त्यांनी आवर्जून उल्लेख केला. मेळाव्याचे समन्वयक अशोक कृष्णा नाईक यांनी मेळाव्याला उदंड प्रतिसाद लाभला याबद्दल आनंद व्यक्त करून, समाज बांधव एकत्र येण्यासाठी भविष्यात असेच अनेक उपक्रम राबविले जातील असे सांगितले.

# शहराचा मास्टर प्लान तयार करून नियोजन करा

## विविध सुविधा उपलब्ध होणार : डिचोलीत रोटरी पार्कचे लोकार्पण

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १६ :** राज्यातील प्रत्येक मतदारसंघात लाइफस्टाईल चेंज प्रमाणे आधुनिक बदल घडवणे गरजेचे असून वेगवेगळ्या सुविधा बहाल करताना नवे प्रकल्प येणे गरजेचे आहे डिचोलीचा मास्टर प्लान तयार करून विकासाचा आराखडा तयार करा नगरी विकास खात्या मार्फत आपले सर्व प्रकारचे सहकार्य असून जागा निश्चित करून प्रकल्प उभारा, अशा घोषणा गोवा राज्य नागरी विकास मंत्री विश्वजित राणे यांनी डिचोली येथे केले.

डिचोली पालिका विभागातील रोटरी क्लब आवारात उभारण्यात झालेल्या पार्कचे उद्घाटन विश्वजीत राणे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये, नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, दीपा पळ, स्थानिक नगरसेविका अपर्णा फोगेरी, नगरसेवक भाजप अध्यक्ष डॉ. कौस्तुभ पाटणेकर, अभियंता हुसेन मुजावर, स्वप्निल दीक्षित, वल्लभ साळकर, प्रभू कुंदन व चंदन फोगेरी व इतर मान्यवर उपस्थित होते.

वाळपई सारख्या ग्रामीण भागाचा प्रतापसिंग राणे व आम्ही कायापालट केला. वेगवेगळ्या विकास योजना आणल्या त्याच धर्तीवर डिचोली हा तालुक्याचा केंद्र बिंदू असल्याने या भागातही वेगवेगळ्या ठिकाणी जागा निश्चित करून वॉकिंग ट्रॅक बालोद्याने महिलांसाठी योजना स्विमिंग पूल या माध्यमातून शहराला आधुनिक प्रकल्पांचा साज पुरवणे गरजेचे आहे. आमच्या खात्यातर्फे डिचोली शहरात अनेक योजना सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

आमदार डॉ. चंद्रकांत शेट्ये यांनी विकासाला आधुनिकतेचा साज पुरवताना नवे प्रकल्प उभारण्यात येत आहेत या कार्यात मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, मंत्री विश्वजीत राणे व इतर मंत्र्यांचे सहकारी लाभत आहे. डिचोली चा विकासाचा आराखडा तयार करताना नवे प्रकल्प उभारण्यासाठी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केलं.

अपर्णा फोगेरी यांनी या भागात सुसज्ञ अशा पार्क उभारून सुविधा तसेच इतर सुविधा बहाल केल्याबद्दल विश्वजीत राणे व आमदार शेट्ये यांचे अभिनंदन केले. मान्यवरांच्या हस्ते पार्कचे लोकार्पण करण्यात आले.



बोर्डे डिचोली येथील वडेश्वरच्या प्रागणांत होमकुंड उत्सवात देवीचा कळस डोक्यावर घेऊन अग्निदिव्य साकारताना व्रतस्थ. बाजूला भाविक.



माशेल : भाऊसाहेबांच्या तसबिरीस पुष्पहार अर्पण करताना मोहन वेरेकर. बाजूस नोनु नाईक, अशोक तिळवी, विश्राम गावकर, अनंत सावंत, धर्मानंद बोरकर व दिलीप तुरी.

# भाऊसाहेबांचे शैक्षणिक क्षेत्रात अतुलनीय कार्य

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ मोहन वेरेकर : माशेल येथे भाऊसाहेब बांदोडकर जयंती उत्साहात

**सावईवेरे दि. १२ :** गोवा मुक्त झाल्यावर अतिशय प्रतिकुल परिस्थितीत भाऊसाहेबांनी गोव्याच्या विकासाला योग्य दिशा दिली. प्रत्येक गरीब व्यक्तीला ते मदत करायचे. भाऊसाहेबांसारखे नि:स्वार्थी नेते आज मिळणे कठीण आहे. भाऊसाहेबांची तुलना दुसऱ्या एखाद्या मुख्यमंत्र्यांशी करणे हे अत्यंत चुकीचे आहे. भाऊसाहेबांनी शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात अतुलनीय कार्य केलेले आहे. जे नेते समाजासाठी नि:स्वार्थीपणे कार्य करतात तेच नेते श्रेष्ठ ठरतात, मोहन वेरेकर यांनी सांगितले.

ते ज्येष्ठ नागरिक मंच माशेल यांच्यातर्फे स्व. दयानंद बांदोडकर यांची जयंती कार्यक्रमात बोलत होते. सदर कार्यक्रम माशेल येथील नोनूस विलेजच्या संगीता सभागृहात पार पडला.

या सोहळ्यास व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून माजी कुर्टी जिल्हा पंचायत सदस्य मोहन वेरेकर, खास निमंत्रित बेतकी – खांडोळा ग्रामपंचायतीचे पंचसदस्य मनोज गावकर, नोनू नाईक, मंचचे अध्यक्ष अशोक तिळवी, उपाध्यक्ष विश्राम गावकर, सचिव अनंत सावंत,खजिनदार धर्मानंद बोरकर, आयोजन समितीचे अध्यक्ष दिलीप तुरी उपस्थित होते.

यावेळी मनोज गावकर यांनी माशेल ज्येष्ठ नागरिक मंचाला स्वतः ची वास्तू उभी करण्यासाठी या भागात जमीन उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन दिले. नोनु नाईक यांनी ज्येष्ठ नागरिकांची स्वतः ची वास्तू उभी राहेपर्यंत ज्येष्ठ नागरिकांच्या कार्यक्रमांसाठी आपला सभागृह सदैव उपलब्ध राहणार असल्याचे आश्वासन दिले.सर्वप्रथम प्रार्थनेने कार्यक्रमास प्रारंभ झाला.

प्रास्ताविक अशोक तिळवी यांनी केले. पाहुण्यांची ओळख धर्मानंद बोरकर यांनी करून दिली. मोहन वेरेकर यांच्या हस्ते भाऊसाहेबांच्या तसबिरीस पुष्पहार अर्पण करून तसेच दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. ज्येष्ठ नागरिक मंचतर्फे ज्येष्ठ नागरिकांसाठी घेण्यात आलेल्या विविध क्रीडा स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.भोलानाथ परब यांनी बक्षिसांची यादी सादर केली. सूत्रनिवेदन शिवलिंग सावंत यांनी केले तर शेवटी दिलीप तुरी यांनी आभार मानले.

# 'सुखाच्या शोधात अन् मधुर गीतांच्या विश्वात' कार्यक्रमात रसिक मंत्रमुग्ध

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ११ :** सुरईश आयोजित आणि ग्लोबस मॅनेजमेंट सर्व्हिसेस प्रा. लि. प्रस्तुत 'सुखाच्या शोधात अन् मधुर गीतांच्या विश्वात..' हा संगीत आणि उद्बोधन याची सांगड घालून सुखाचां मंत्र देणारा कार्यक्रम रविवारी येथील इन्स्टिटट्यूट आयएमबी सभागृहात रसिकांच्या उस्फूर्त प्रतिसादात सादर झाला.

पुणे येथील प्रसिद्ध गायिका श्रुती जोशी, नवाब शेख आणि मधुर आवाजाची युवा गायिका नव्या भट यांनी भावपूर्ण शैलीत भावमधुर गीतांची बरसात करून रसिकांना मनमुराद आनंद दिला. जय शारदे.., फुलले रे क्षण..,कबिराचे विणतो शेले.., सुन्या सुन्या मैफिलीत.., थकले रे नंदलाला.. अशा रचना श्रुती हिने आर्ततेने पेश करून रसिकांची भरभरून दाद घेतली. नवाब ने तोच चंद्रमा.., सखी मंद झाल्या तारका.., संथ वाहते कृष्णामाई.., हा खेळ सावल्यांचा.. तसेच श्रुती समवेत चिंब पावसानं.. व जीव रंगला.. ही युगुलगीते आपल्या रसिल्या आवाजात गाऊन रसिकांना प्रभावित केले. नव्या हिने हे शाम सुंदर.., वृक्षवल्ली आम्हा सोयरी.., आपदा राजपदा.., मी मज हरपून.., पाखरा जा.. या रचना नजाकतीने पेश करून रसिकांना रिझविले. नितीन कोरगावकर (तबला), बाळकृष्ण मेस्त (सिंथेसायझर), हर्षद खराडे (ऑक्टोपॅड), रोहित खांडोळकर (संवादिनी) व तारानाथ होलेगद्दे (तालवाद्य) यांची पोषक साथसंगत व श्रिया टेंग्से यांचे सुरेख निवेदन यामुळं कार्यक्रमाची लज्जत वाढली. ग्लोबस मॅनेजमेंट सर्व्हिसेस चे व्यवस्थापकीय संचालक सुरेश लोटलीकर व सुरईश चे अध्यक्ष प्रमोद पै धुंगट यांनी सुखाच्या शोधात.. विषयावर उद्बोधन करून रसिकांना मंत्रमुग्ध केलेले नांदेड येथील ख्यातनाम वक्ते डॉ. नंदू मुलमुले (सुवर्णपदक प्राप्त मनोविकारतज्ज्ञ) यांचा सन्मान केला.गायक कलाकारांचा सन्मान ग्लोबस च्या संचालक मिलन लोटलीकर, अक्षता लोटलीकर व अजिंक्य लोटलीकर यांनी तर वादकांचा सन्मान सुरईश चे उपाध्यक्ष संदिप गणपत नाईक यांनी केला. सचिव नितीन कोरगावकर यांनी प्रास्ताविक केले.



पणजी : सुखाच्या शोधात अन् मधुर गीतांच्या विश्वात कार्यक्रमात गाताना श्रुती जोशी सोबत निवेदिका श्रिया टेंग्से, नव्या भट व नवाब शेख आणि वादक.

### सुख घेण्यात आहे आनंद देण्यात

यश, सुख, आनंद आणि समाधान या चार संकल्पना म्हणजे माणसाच्या पुरुषार्थाची चौकट. खरं सुख कशात आहे याचा शोध आयुष्य सरेपर्यंत लागत नाही. यशाचा ध्यास घ्यावा परंतु आपल्या आनंदाची सांगड यशस्वी होण्यात घालवू नये. यशाकडे नेणारा प्रवास आनंददायक. झाला पाहिजे. सुख इंद्रियांच्या उपभोगाने मिळते पण ते तात्कालिक असते. सुख घेण्यात तर आनंद देण्यात मिळतो. आयुष्याच्या उत्तरार्धात माणसाने समाधानी व्हावे, त्यासाठी आत्मस्विकार, क्षमाशीलता, कृतज्ञता, विनोदबुद्धी हवी.

# 'मयुरी' बालसाहित्य पुस्तकाचे प्रकाशन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १६ :** मूळ आत्मा मरू न देता, बालसाहित्यातील प्रादेशिक शब्दांचा अर्थबोध जपून डॉ. स्मिथा भंडारे कामत यांनी 'मयुरी' या बालसाहित्य पुस्तकाचे केलेला इंग्रजी अनुवाद उत्कृष्ट झाला आहे व मूळ लेखिका ज्योती कुंकळकर यांनी ही समतोल लेखन केलेले आहे, असे मत धेंपे वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज कामत यांनी दोनापॉल येथे राजभवनात व्यक्त केले. साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त ज्योती कुंकळकर यांच्या मयुरी या बालसाहित्य पुस्तकाच्या डॉ.स्मिथा भंडारे कामत यांनी इंग्रजीत अनुवादित केलेल्या पुस्तकाचे प्रकाशन शनिवारी राज्यपाल पी.एस. श्रीधरन पिल्लई यांचे स्विय सचिव एम. राव यांच्या हस्ते करण्यात आले त्यावेळी डॉ. कामत सन्माननीय पाहुणे म्हणून बोलत होते. व्यासपीठावर ज्योती कुंकळकर, डॉ. स्मिथा भंडारे कामत उपस्थित होत्या.श्री. राव म्हणाले, पुस्तक प्रकाशित करणे ही सोपी गोष्ट नाही आणि आणि बालकांसाठी साहित्य लिहिणे ही गोष्ट कठीण असते. इंग्रजीत अनुवादित झाल्याने हे पुस्तक जास्त वाचकांपर्यंत पोचेल. डॉ. स्मिथा म्हणाल्या, प्रत्येक व्यक्तिमत्वाचे भावजीवन व अभिव्यक्ती राखून अनुवाद करणे माझ्यासाठी आव्हान होते.सामाजिक, सांस्कृतिक सीमारेषांचे भान व मूळ कथानकाला हानी पोचू न देणे याची काळजी घेणे आवश्यक होते. माझ्यासाठी ही संधी होती. ज्योती कुंकळकर यांनी सांगितले की, कोकणी अकादमीने बालकांसाठी लिहिण्याचा प्रकल्प दिला होता व माझे बालपण काणकोणात गेलेले त्याअनुषंगाने मी मयुरी साकारली आहे. यात बरेच ग्रामीण शब्द आले आहेत व अनुवाद करतांना त्या मूळ शब्दांना धक्का लागू न देण्याची खबरदारी डॉ. स्मिथा यांनी घेतली आहे. डॉ. केदार फडते, डॉ. अनुपमा कुडचडकर, डॉ. संदिप लवंदे, डॉ. सुप्रिया धोंड यांना पुस्तकाची प्रत भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. तानिया शिरोडकर यांनी सूत्रसंचालन केले. कामाक्षी कामत यांनी आभार मानले.




दोनापावल : राजभवन येथे मयुरी या अनुवादित पुस्तकाचे प्रकाशन करतांना एम. राव. सोबत ज्योती कुंकळकर, डॉ.मनोज कामत व डॉ. स्मिथा भंडारे कामत.